Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

महाकुंभमेळ्याला आजपासून प्रयागराज इथं सुरुवात झाली. देश-विदेशातून आलेल्या लाखो भाविकांनी गंगा- यमुना- सरस्वती या संगम तटावर स्नान केलं. सकाळी साडे नऊ वाजेपर्यंत जवळपास ६० लाख भाविकांनी स्नान केल्याचं वृत्त आहे.

महाकुंभमेळ्याची सुरुवात झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय मुल्ये आणि संस्कृतिची जोपासना करणार्या करोडो भारतीयांसाठी हा एक विशेष दिवस असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. महाकुंभमेळा हा देशाच्या शाश्वत अध्यात्मिक परंपरांचं प्रतिक असून, श्रद्धा आणि सद्भावनेचा उत्सव असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

दरम्यान, कुंभमेळ्यासाठी प्रशासनानं सर्व तयारी केली असून, भाविकांना या पर्व काळात शुद्ध हवेचा पुरवठा व्हावा यासाठी विशेष जंगल क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत. गेल्या दोन वर्षात प्रयागराज शहरात १० ठिकाणी ५५ हजार चौरस मीटरवर ६३ प्रकारची १ लाख २० हजार झाडं लावून हे जंगल विकसित करण्यात आलं आहे.

****

जम्मू काश्मीरमधल्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या बोगद्यामुळे लेह रस्त्यावरील श्रीनगर आणि सोनमर्ग दरम्यान वर्षभर सर्व ऋतुंमध्ये संपर्क निर्माण होईल. १२ किलोमीटर लांबीच्या सोनमर्ग बोगदा प्रकल्पासाठी दोन हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च आला असून, हा बोगदा भूस्खलन आणि हिमस्खलनप्रवण रस्त्यांना टाळून लडाखशी अखंड संपर्क निर्माण करणार आहे. यामुळे सोनमर्ग इथल्या हिवाळी पर्यटन, साहसी खेळ आणि स्थानिक उपजीविकेला प्रोत्साहन मिळेल. वाहनांचा वेग आता ताशी ३० किलोमीटरवरुन ७० किलोमीटर होईल, आणि यामुळे श्रीनगर आणि लडाख दरम्यान वेगवान आणि अखंड

संपर्क निर्माण होईल. या बोगद्यामुळे संरक्षण रसद वाढेल, तसंच आर्थिक प्रगती होऊन जम्मू काश्मीर आणि लडाखमधील सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मता वृद्धिंगत होईल.

****

मकर संक्रांत, पोंगल, बिहू, लोहरी आदी सणांच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचं प्रतिक असून, सर्वांच्या आयुष्यात उत्साह आणि आनंद घेऊन येत असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांवेळी, महाराष्ट्र राज्यानं केलेल्या कामाचं केंद्रीय निवडणूक आयोगानं कौतुक केलं आहे. त्यामुळे, आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं, तिथल्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यातल्या अधिकाऱ्यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने आमंत्रित केलं होतं. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, गेल्या आठवड्यात दिल्लीत एक दिवसीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेला, मुंबईचे महापालिका आयुक्त आणि मुंबई शहर आणि उपनगरचे जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मतदान केंद्र व्यवस्थापन, तेथील पायाभूत सुविधा आदी विषयांवर मार्गदर्शन केले. राज्याचे अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी समाज माध्यमांचा उपयोग आणि माध्यम देखरेख आणि नियंत्रण समितीच्या कामकाजाविषयी राज्याच्या कामकाजाची माहिती दिली. या कार्यशाळेला दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी आर. एलिस वाझ, विविध जिल्हा निवडणूक अधिकारी, रिटर्निंग ऑफिसर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

****

पुण्यात होणार असलेल्या विश्व मराठी संमेलनात यंदा प्रथमच श्रीमद्भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, संत तुकारामांची गाथा अशा ग्रंथांवर चर्चा होणार असल्याची घोषणा, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली. रत्नागिरीत सुरू असलेल्या कीर्तनसंध्या उपक्रमाला काल भेट दिल्यानंतर ते बोलत होते. मराठी संस्कृती जगभरात नेण्यासाठी विश्व मराठी संमेलन आयोजित केलं जातं, मात्र या संमेलनाचा पॅटर्न बदलला असून,

मराठी संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत नेण्यासाठी या ग्रंथांवर चर्चा करण्याचा निर्णय घेतल्याचं सामंत यांनी सांगितलं.

****

नाशिक शहरात मुंबई –आग्रा महामार्गावरील द्वारका परिसरात उड्डाण पुलावर पिकअप आणि लोखंडी सळया वाहून नेणाऱ्या आयशर ट्रकच्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले. जखमींना नाशिकच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या अपघातामुळे नाशिक शहरातून जाणाऱ्या उड्डाणपुलावर दोन ते तीन किलोमीटर पर्यंत वाहतूक ठप्प झाली होती.

****

नांदेड जिल्ह्यात जात प्रमाणपत्र निर्गतीसाठी त्यासंबंधी प्रलंबित प्रकरणं निकाली काढण्यासाठी विशेष शिबीर राबवण्यात येत आहे. यासाठी मागील दोन शनिवारी घेतलेल्या विशेष शिबीरात १२०० जात प्रमाणपत्र निकाली काढण्यात आली.

****

नवी दिल्लीत आजपासून पहिल्या खो–खो विश्वचषक क्रीडा स्पर्धा रंगणार आहेत. १३ जानेवारी ते १९ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २३ देशांचे ३९ संघ सहभागी होत आहेत. भारताच्या पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकर तर महिला संघाचं नेतृत्व बीड जिल्ह्यातली प्रियंका इंगळे करत आहे.

****